
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा भारतीय समाजाबद्दलचा नवदृष्टीकोन



प्रा. डॉ. दिगंबर शिवाजी वाघमारे
विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभूर्णी.

## प्रस्तावना:

आधुनिक काळामध्ये पाश्चयात यांच्या संपर्कात भारतीय समाजव्यवस्था आल्यानंतर भारतीय समाजव्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आणि पाश्च्यात्यांनी केलेली प्रगती आणि नवसमाजनिर्मिती आपण हि अनुसरली पाहिजे.असे भारतीय नवशिक्षितांना वाटू लागले. आधुनिक शिक्षण,विज्ञानवादी दृष्टीकोन,स्त्रीसमानता,वर्ण-जाती विरहीत समाज धार्मिक कर्मकांड विरोध, धर्मचिकित्सा,संस्कृती श्रेष्ठत्व,याविषयी मंथन सुरु झाले.आधुनिक काळात भारतीय समाजव्यवस्था कोणत्या आधारावर उभी असावी.याबद्दल चर्चा,चळवळी सुरु झाल्या.महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय समाजव्यवस्थेबद्दल केलेले चितन लेखन आणि कार्य महत्वाचे ठरते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महात्मा फुले यांच्या जातीनिर्मुलानाच्या भूमिकांना व कार्याला पूरक काम केले.जातीसंघार्षाच्या वाटचालीमधील वारकरी संप्रदायाचा त्यांच्यावर प्रभाव होता.त्याचप्रमाणे वर्ण-जातीविरहित बौद्ध धर्माचे ते पुरस्कर्ते होते. मानवतावादाच्या दृष्टीने महर्षी शिंदे यांनी आयुष्यभर काम केले. भारतीय समाज हा आधुनिक पायावर उभा राहिला पाहिजे हे त्यांची तळमळ होती.त्यांनी स्त्रियांचे प्रश्न,शेतकऱ्यांचे प्रश्न आत्मीयतेने सोडवले.भारतीय अस्पृश्यता हा त्यांच्या संशोधनाचा विषय राहिला,ते भारतीय अस्पृश्तेचे मूळ शोधण्यासोबत तिची दाहकता,आणि निर्मुलन या पातळयावर महत्वपूर्ण काम करतात.महर्षी शिंदे यांनी विविध संस्था स्थापन करून भारतीय समाज हा गतिमान बनविण्याचे अविरत प्रयत्न केले.

## निराश्रित सेवासदन :

महर्षी शिंदे यांनी अस्पृश्य समजलेल्या स्त्रियांच्या उद्धारासाठी विविध उपाय योजना केल्या.पुरुषाप्रमाणे स्त्रियांना आत्मसन्मान मिळून देणे,शिक्षणाचा प्रसार करणे यासाठी म्हणून ते प्रयत्न करत राहिले.निराश्रित सेवासदानाच्या माध्यमातून अस्पृश्यासाठी शाळा काढण्यात आल्या.या सदनाच्या माध्यमातून माणसातील भेद कमी करण्याचा प्रयत्न केला जात असे.मिशनचा पहिल्यापासून एक दंडक ठरला होताकी,मिशनमध्ये काम करणार्यांनी ज्या ठिकाणी अस्पृश्य लोक राहतात तेथेच त्यांच्यांत मिसळून राहावे.काम करणार्यांनी आपल्या कुटुंबासह येऊन राहावे.[१] महर्षी शिंदे यांनी भारतीय समाजाला आपल्या कृतीशीलतेने दिशा देण्याचे काम केले.

मिशनचे हेतू पुढील प्रमाणे होते- १) शिक्षण प्रसार २) नोकऱ्या मिळवून देणे ३) सामाजिक अडचणीचे निवारण करणे. ४) सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील आणि नागरिकता या गुणांचा प्रसार वरिष्ठ वर्गातील जे कोणी

उत्साही स्त्री-पुरुष विशेषतः सुशिक्षित भगिनी आपणास वाहून घेऊन मिशनचा कामासाठी येण्यास तयार असतील त्यांच्यामध्ये कामाची पात्रता येण्यासाठी त्यांना तयार करणे आणि अस्पुश्य वर्गातील गरीब स्त्रीयामधून त्यांना कामे देणे.मिशनचे काम उदार धर्माच्या पायावर चालत होते.[२] मिशन कार्य :दर शनिवारी व्याखाने आणि कीर्तने होत,रविवारी सकाळी धार्मिक शिक्षणाचे वर्ग आणि सायंकाळी उपासना होत.प्रथम प्रथम हे काम मी स्वतःच माझ्या बहिणीच्या सहाय्याने करीत असे.सदन निघाल्यावर त्याची स्वतंत्र व्यवस्था चांगली झाली. सणाचे दिवशी सामाजिक मेळे होत. त्यात अस्पृश्यवर्गीय स्त्री-पुरुष वरिष्ठ वर्गातल्या स्त्री-पुरुषात समानतेने भाग घेत.[३] अस्पृश्यता निर्मुलन होण्यासाठी काही सहज,सोपे प्रयोग करणे गरजेचे होते यासाठी सण,उत्सवाचे निमित्त साधून महर्षी शिंदे यांनी सामाजिक मेळावे घेतले.या मेळाव्यामध्ये वरिष्ठ जातीतील स्त्री-पुरुष व अस्पृश्य जातीतील स्त्री-पुरुषांना एकत्र आणले.यातून अस्पृश्यता कमी होण्यास मदत झाली.[४] महर्षी शिंदे यांनी स्पृश्यांमध्ये अस्पृश्यता निर्मूलनाची ओढ निर्माण केली.मिशनचे हेतू,नियम कार्यपद्धती पाहिल्यास अस्पृश्यता निवारणाची व जातीभेद विरहीत समाजाची ती पायाभरणी होती असे म्हणता येईल.निराश्रित सेवासादानाच्या माध्यमातून अस्पृश्यांना शिक्षित करण्याचा व त्यांना स्पृश्य समाजाप्रमाणे सुसंस्कृत बनविण्याचा प्रयत्न महर्षी शिंदे यांचा होता.

### अस्पृशांची गावे वसविण्याचा प्रयोग :

जातीव्यवस्था ही शोषण-शासनाची व्यवस्था आहे.कनिष्ठ जाती ह्या वरिष्ठ जातीवर आर्थिक दृष्टीने अवलंबून असल्याने त्यांच्या अवलंबित्वामुळे त्या अन्यायाचा फारसा प्रतिकार करू शकत नाहीत.जातीव्यवस्थेचे आर्थिक आधार नाकारण्यासाठी अस्पृश्यांना जमिनी देऊन त्यांचे आर्थिक अवलंबित्व कमी करण्यासाठी त्यांची स्वतंत्र गावेच वसवण्याची महर्षी शिंदे यांची योजना होती.त्यांचा हा प्रयोग म्हणजे भारतीय समाजाबद्दलची नवदृष्टी होती.मांग,रामोशी,गारुडी,बेरड वगैरे कित्येक अस्पृश्य किवा अस्पृश्यवजा मानिलेल्या जातीची गणना सरकारदृष्ट्या गुन्हेगार जातीत होत.ह्या बाबतीत डी.सी.मिशनच्या पुणे शाखेकडून १९१४ साली जे प्रयत्न झाले.त्यांचा अहवाल मिशनच्या त्य वर्षीच्या ८ व्या वार्षिक रिपोर्टत मध्ये पण १७ -२६ वर नमूद आहे.सातारा जिल्ह्यात सुमारे एक हजार एकर पडीक जमीन मुंबई सरकारने देऊ केली होती. रा.शिंदे यांनी आणि पुणे शाखेचे तेव्हाचे डॉ.मॅन ह्या दोघांनी सातारा जिल्ह्यातील जमिनीचा एकक सोयीचा भाग निवडून काढण्यासाठी दौरा केला. रा.शिंदेनी रे त्या उद्धेशाने सातारा जिल्ह्यातील बहुतके खेड्यातून जवळ-जवळ १०० मैल प्रवास करून गुन्हेगार गणलेल्या मांग लोकांची स्थिती पहिली व जमिनी तपासल्या.शेवटी २०००० खर्चाची एक योजनाही तयार केली होती.[५] महर्षी शिंदे यांना या माध्यमातून भारतीय समाजव्यवस्था हे नाव धर्तीवर उभी करायची होती.

### कौटुंबिक उपासना मंडळे :

महर्षी शिंदे यांनी समाजातील विकृत मानसिकता बदलण्यासाठी व माणसातील विविक जागा करण्यासाठी कौटुंबिक उपासना मंडळे स्थापन करून कौटुंबिक पातळीवर काही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.कुटुंबे कोणत्याही दर्जाची,जातीची,राष्ट्राची अगर धर्माची असोत अथवा ह्यापैकी कोणत्याही उपाधी नसलेली असोत.तिकडे पाहण्याचा मंडळाचा अधिकार नाही.मंडळात येणाऱ्याना उपसानेसंबंधी खरी श्रद्धा आणि कळवळ पाहिजे आणि ती नियमितपणा,वक्तशीरपणा,स्थिरपणा आणि शांतपणा ह्या गुणांच्या द्वाराच दिसून आला पाहिजे एवढीच मंडळाची शर्त आहे.मंडळाचे उपासनेत किवा कोणत्याही कामात जातीचा किवा धर्माचा भेद मुळीच पाडण्यात येत नाही.कोणत्याही जातीच्या व धर्माच्या कुटुंबाला मंडळाचे सभासद होता येते.[६] उपासना मंडळामध्ये विविध जातीतील लोकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये भावनिक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न महर्षी शिंदे यांनी केला. उपासना मंडळे माणसामध्ये चित्तबुद्धी निर्माण करून मानवतावादाची शिकवण देतात. कौटुंबिक जीवनामध्ये एकोपा निर्माण करून समाजामध्ये ऐक्य निर्माण करण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न होता.

## जातीनिराकरणाखेरीज स्वराज्य अशक्य :

भारताच्या स्वराज्याच्या राजकीय महत्वकांक्षेच्या मार्गात जातिभेदाचा अडथळा जातीभेदाचे पुरस्कर्ते आणत आहेत,असा स्पष्ट आरोप महर्षी शिंदे यांनी केला आहे.शिंदे यांच्या मते,एका जातीचे संचित हितसंबंध तिला साधक असले तरी इतर जातींना बाधकच असतात,एका जातीला दान टे दुसऱ्या जातीला ऋण असा हा नेहमी अन्योन्य संबंध असतो.ह्यामुळे ह्या संबंधाना राष्ट्रीय संबंध कधीच म्हणता येणार नाही.जातीयतेच्या पुरस्कर्त्याला इंग्रजीत ब्युरोक्राट असे नाव असून भारताला स्वराज्य मिळण्याआड परकीय ब्युरोक्राटाइतकेच स्वकीय ब्युरोक्राटही जबाबदार आहेत.असा स्पष्ट निर्वाळा कर्मवीरांनी दिला आहे.काळा असो व गोरा असो,स्वतःला उच्च म्हणवीत असो व निच्च म्हणवीत असो तो .... आपल्या जातीचे हक्क सांगून राष्ट्र कार्याला विघ्न आणीत असेल तर तोच एक ब्युरोक्राट समजावा आणि त्याच्या हातून जर काही होईल तर स्वराज्याच्या थडग्यावर मूठभर माती जास्तीच पडेल.दुसरे काय?म्हणून आम्ही अंतर्मुख होऊन आमच्यातील जातीभेदाना ताळयावर आणल्याशिवाय आमच्या स्वराज्यवाद्यांना कायमचा जय मिळणार नाही आपल्याकडच्या जातीभेदाबद्दल लटकी कीव करणारे परकीय जातीवादी आणि स्वराज्यवादाची तोंडपाटीलकी करून आपापल्या जातीचे संचित हितसंबंध कसोशीने जपणारे जातीवादी या दोन्ही गुप्त जातीभेदांचे सातून संगनमत होण्याचा मोठा धोका,महर्षी शिंदे यांना स्पष्ट दिसत होता.[७] महर्षी शिंदे यांनी शेवटपर्यंत जातीविरहित भारत निर्माण व्हावा यासाठी तळमळ व्यक्त केली.स्पृश्याना भावनिक साद घातली.जातिभेदाचा पुरस्कार करणे म्हणजे राष्ट्राचे नुकसान करणे आहे असे त्यांना वाटत असे. देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा असताना आपल्यातील जातीभेद,अस्पृश्यता,आर्थिक विषमता नष्ट झाल्या पाहिजेत यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारताच्या समाजकारण,राजकारणाला वेगळे वळण दिले.जातिधर्म विरहीत समाजकारण आणि राजकारण ही त्यांची भूमिका होती. आयुष्यभर धर्मसुधारणा सुचवून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी टे धडपडत होते. महर्षी शिंदे यांचा मार्ग अतिशय आक्रमक आणि क्रांतिकारक नसला तरी त्यांना समग्र परिवर्तन हवे होते.

## संदर्भ साधने :


१. पवार गो.मा.व शिंदे रणधीर (संपा.)महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङमय खंड-२ पृ .२१४
२. तत्रैव,पवार पृ.२१५
३. तत्रैव,पवार पृ.२१५
४. तत्रैव,पवार पृ.२१६
५. पवार गो.मा.( संपा.) निवडक विठ्ठल रामजी शिंदे साहित्य अकादमी,नवी दिल्ली पृ.२०
६. तत्रैव,पवार पृ. ५
७. भोळे भा.ल.,महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण ,लोकवाङमय गृह मुंबई पृ.३४